# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/01/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### घरफोडी करणाऱ्या गुन्हयातील आरोपी गजाआड

### पोलीस स्टेशन खापरखेडा यांची कारवाई

पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दिनांक ०४/०१/२०२३ रोजी फिर्यादी नामे— सुशिलसिंग अवधेशसिंग परीहार, वय ५३ वर्ष, रा. ग्राम साहपूर पोस्ट हिनवता, जि. रिवा राज्य म. प्र. ह. मु. मराठा सिमेंट वर्कस अंबुजा सिमेंटस लिमीटेड उपरवाही ता. कोरपना जि. चंद्रपूर यांनी तक्रार दिली की, खापरखेडा पॉवर प्लॉट बी पॉईंट मधील अम्बुजा सिमेंट फलाई ऐश लोडींग पॉईंट जवळील स्टोर रूम मधील ठेवलेले पॉवर डिस्ट्रीब्युशन पॅनल लॉजिक कंट्रोल पॅनल बॅटरी आणि इलेक्ट्रॉनिक्स पार्टस असा एकुण ३,२४,०००/— रू. चा मुद्देमाल दि. १०/०९/२०२२ चे १७.०० वा. ते ०२/०१/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान स्टोअरचा ताला तोडुन कोणीतरी अज्ञात आरोपीने मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. अप. क्र. ०५/२३ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि. अन्वयेचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासात पोस्टे खापरखेडा यंथील डी.बी पथक पोस्टे परिसरात पेट्रोलिंग करीत असता मुखबिरव्दारे मिळालेल्या खबरेवरून आरोपी नामे— लक्ष्मीनारायण उर्फ मुच्छी गरीबा सुर्यवंशी वय ३६ वर्ष, रा. वार्ड नं. ०६ चनकापूर ता. सावनेर यास ताब्यात घेवुन सदर गुन्हयाच्या संबंधाने विचारपूस केली असता सदर गुन्हा कबुल केल्याने तसेच सदर गुन्हा करतेवेळी सोबत २) करण बुद्धु यादव, वय २१ वर्ष, रा. वार्ड नं. ०३, चनकापूर ता. सावनेर ३) श्रवण केदारनाथ रविदास, वय २२ वर्ष, रा. वार्ड नं. ०६ चनकापूर ४) रोहीत देशराज सुर्यवंशी, वय २९ वर्ष, रा. वार्ड नं. ०३ चनकापूर ता. सावनेर ५) आशिष उर्फ गुल्लु राजबहादुर वर्मा, वय २३ वर्ष, रा. चनकापूर ता. सावनेर ६) सुरज उर्फ मुसा रमेश वरणकर, वय २४ वर्ष, रा. चनकापूर ता. सावनेर यांचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने आरोपीतांना गुन्हयात अटक करण्यात आली. तसेच गुन्हयात चोरीचा मुद्देमाल विकत घेणाऱ्या कबाडी व्यवसायिक नामे— ७) सत्यम सुरेंद्रसिंग ठाकुर वय ३३ वर्ष, रा. मानसी लेआउट कळमना वस्ती नागपूर ८) लवलेश कामताप्रसाद शाहू वय ४७ वर्ष, नाका नं. ४ कळमना वस्ती गौरीशंकर नगर नागपूर ९) प्रविण उर्फ पिंटु शिवकुमार शाहू, वय ३१ वर्ष रा. नाका नं.०४ शनी मंदीरच्या मागे कळमना नागपूर यांना गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

वरील आरोपीतांचे ताब्यातून १) पॉवर डीस्ट्रीब्युशन पॅनलचे पार्ट्स तुटलेल्या अवस्थेत किमती ६५,०००/—रू. २) लॉजिक कंट्रोल पॅनल केबल्स मधील जाळलेला ४० किलो कॉपर वायर किंमती अंदाजे ४०,०००/—रू. ३) बॅटरी १६ नग किमती अंदाजे १,००,८००/—रू. ४) लाईटींग फिक्सर ०५ नग तुटलेल्या अवस्थेत किमती अंदाजे १५,०००/—रू. ५) कुलींग वॉटर स्प्रे नोजल तुटलेल्या अवस्थेत १०५ नग किमती ९४५०/—रू. ६) वॉटर पंप मोटर ०२ नग किमती अंदाजे १०,०००/—रू. ७) डोम वाल्व एअर लिमीट स्विच २५ नग किमती अंदाजे ७,०००/—रू. ८) महींद्रा कंपनीची अल्फा प्लस ०३ चाकी गाडी क्र. एम.एच. ४०/ए.के. १८५६ किमती अंदाजे असा एकुण ४,४७,२५० रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही श्री. विशाल आनंद पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. मुख्तार बागवान उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रविण मुंडे ठाणेदार खापरखेडा, डी. बी. पथकचे पोलीस हवालदार उमेश ठाकरे, आशिष भुरे, पोलीस नायक प्रदीप मने, शैलेश यादव, प्रमोद भोयर, राजू भोयर, मुकेश वाघाडे यांनी पार पाडली.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. वेलतूर :—** अंतर्गत १६ कि. मी अंतरावरील डोंगरमौदा मांढळ रोड येथे दिनांक ०८/०१/२०२३ चे १८.०० ते १८.१० वा. सुमारास यातील मृतक नामे —श्रीमती संगीता रमेश मेश्राम, वय ५० वर्ष, रा. ठाणा हया रोडच्या बाजुला बाथरूम करीता उभ्या असतांना यातील ट्रक क्र. एमएच—४९/ए.टी—३३४७ चा चालक आरोपी नामे— ग्यानीवंत गोपाळ शिवुरकर, वय ३४ वर्ष, रा. जिवनापुर यांनी आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतक महिला यास जोरदार धडक मारून यातील मृतकच्या मरणास आरोपी ट्रक चालक हा कारणीभुत झाला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस हवालदार मदन आसतकर ब. नं. ६३६ पो.स्टे. वेलतुर यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. वेलतूर येथे आरोपी चालकाविरुध्द क. २७९, ३०४ अ, भादवि. सहकलम १८४, १३४ मो.वा.का कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक नितेश डोर्लीकर पो.स्टे. वेलतुर मो.क्र. ९५९५६७८२३४ करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक :—** अंतर्गत १० कि. मी अंतरावरील मौजा सुर्यलक्ष्मी कॉटन मील नगरधन शिवार येथे दिनांक २७/०१/२०२२ चे २१.०० ते २१.१० वा. दरम्यान यातील मृतक व आरोपी नामे— प्रशांत बडूजी बरबटे, वय ३२ वर्ष, रा. चाचेर ता. मौदा जि. नागपुर हा आपल्या ताब्यातील मोटरसायकल क्र. एम. एच.—४०/टी.सी.— ०८९ ने रामटेक वरून आपले गावी चाचेर येथे जात असता सुर्यलक्ष्मी कॉटन मील नगरधन शिवार पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत टर्नींग वर स्वत:ची मोटरसायकल स्लीप होवुन खाली पडल्याने त्याचे डोक्याला, चेहऱ्याला मार लागल्याने पुढील उपचार कामी एम्स दवाखाना खापरी येथे नेले असता तेथे उपचार करून रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर ट्रामा केअर सेंटर येथे भर्ती करण्यात आले होते. उपचारा दरम्यान डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले. सदर मृतक हा स्वत:चे मरणास कारणीभुत ठरला आहे.

सदर प्रकरणी शुभम बंडूजी बरबटे, वय २९ वर्ष, रा. चाचेर ता. मौदा जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३०४ (अ) भादवि. सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक अमित पांडे पो. स्टे. रामटेक मो. नं. ७०३०५४१००१ करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**